## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- १००४/२०२३

**अपिलार्थी, श्री.शरद शंकर पाबरेकर,**
**१७७ अ, पन्हळघर खुर्द, गोरेगांव,**
**ता.माणगांव, जि.रायगड ४०२ १०३.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक (जमीनबाब-१ संकलन), तहसिल कार्यालय माणगांव, मध्यवर्ती प्रशासकीय भवन,माणगांव, ता.माणगाव, जि.रायगड ४०२ १०४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा महसूल अव्वल कारकून, तहसिल कार्यालय माणगांव, मध्यवर्ती प्रशासकीय भवन,माणगांव, ता.माणगाव, जि.रायगड ४०२ १०४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २१.९.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.९.२०२२ | ८.१२.२०२२ | ९.१.२०२३ | ८.२.२०२३ |

अपिलार्थी यांनी दि.१३.४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.९.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. तुषार विष्णु सुर्वे, महसूल सहाय्यक, तहसिल कार्यालय माणगांव आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विपुल हुमे, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय माणगांव हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"०१.१२.२०२१ रोजी तहसिलदार कार्यालयामधून मला नोटीस पाठवली त्याची संपूर्ण पेपर मिळणेबाबत व इतर माहिती:"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थीनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.८.२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, "अपिल अर्ज फेटाळण्यात येत आहे." असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी दि.१८.९.२०२६ रोजीच्या पत्रान्वये आयोगास तसेच जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, (जमिनबाब-१ संकलन) तहसिल कार्यालय माणगांव यांना, सदर प्रकरणी मागवलेली माहिती त्यांना तहसिल कार्यालय माणगाव व भूमी अभिलेख कार्यालय माणगाव यांचेकडून प्राप्त झाली असल्याने सदर अपिल अर्ज मागे घेत आहे असे लेखी कळविले आहे. अपिलार्थी यांची ही विनंती लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणी आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ सप्टेंबर, २०२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ